# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:16.04.2024** **वार:मंगळवार**

---

1. आपले निर्णय हे फक्त देशविकासासाठीच असल्याचं पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन तर तासाभराच्या मुलाखतीत रोजगारासह अनेक महत्वाचे मुद्दे नसल्याची कॉंग्रेसची टिका
2. 'की फॅक्टस स्टेटमेंट' मध्ये उल्लेख नसलेलं कोणतंही अतिरिक्त शुल्क बँका कर्जदारांकडून घेऊ शकत नाहीत. रिझर्व्ह बँकेचं स्पष्टीकरण.
3. कुवेतचे नवे पंतप्रधान म्हणून अहमद अब्दुल्ला अल-अहमद अल-सबाह यांची नियुक्ती.
4. लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे आजपासून उझबेकिस्तानच्या दौऱ्यावर आणि
5. ईशान्य, उत्तर आणि दक्षिण भारतात पुढच्या काही दिवसांमध्ये हलक्या ते मुसळधार पावसाचा अंदाज

**<u>पंतप्रधान मुलाखत</u>**

आपण केवळ देशाच्या सर्वांगीण विकासासाठी निर्णय घेतो, असं मत पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. ते काल एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते. यावेळी त्यांनी 2047 पर्यंत विकसित भारतासाठीचं त्यांचं स्वप्न स्पष्ट करत विकसित भारत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर गेल्या दोन वर्षांपासून काम सुरू असल्याचंही सांगितलं. 'एक राष्ट्र, एक निवडणूक' ची अंमलबजावणी ही आपल्या सरकारची कटिबद्धता असल्याचं सांगत मोदी म्हणाले की, माजी राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीला 'एक राष्ट्र, एक निवडणूक' विषयी अतिशय सकारात्मक सूचना मिळाल्या आहेत. या समितीचा अहवालदेखील सादर झाला असून या अहवालाची अंमलबजावणी झाल्यास देशाला मोठा लाभ होईल. दरम्यान विरोधकांच्या आरोपांचं खंडन करताना ते म्हणाले की, ईडी अर्थात सक्तवसूली संचालनालयानं सर्वाधिक खटले अशा व्यक्ती आणि संस्थांवर नोंदवले आहेत की ज्यांचा राजकारणाशी कोणताही संबंध नाही.

**<u>कॉंग्रेस टीका</u>**

दरम्यान, या मुलाखतीवर कॉंग्रेसनं टीका केली आहे. या मुलाखतीमध्ये महागाई, शेतकरी आणि बेरोजगारीबद्दल पंतप्रधान काहीही बोलले नाही, अशी टिका कॉंग्रेसनं केली. तासाभरापेक्षा जास्त कालावधीच्या या मुलाखतीत मोदी यांनी 'रोजगार' शब्द केवळ दोनदा उच्चारला तर शिक्षण, नोकऱ्या, महिला सुरक्षा आणि कामगार यांचा तर उल्लेखच या मुलाखतीमध्ये नव्हता असं कॉंग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी समाजमाध्यमांवर म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-बिहार</u>**

पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी बिहारमध्ये गया आणि पूर्णिया इथं दोन जाहीर सभा घेणार आहेत. गया लोकसभा मतदारसंघात ही पहिली निवडणूक प्रचार फेरी होणार असून, गांधी मैदानावर ते जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. दुसरी जाहीर सभा दुपारी पूर्णिया इथल्या रंगभूमी मैदानावर होणार आहे. गया इथं 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे, तर पूर्णिया लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात 26 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**केरळ लोकसभा प्रचार**

केरळमध्ये 26 एप्रिलला होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातल्या लोकसभा निवडणुकीसाठी सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते प्रचारासाठी राज्याच्या दौऱ्यावर आहेत. पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल दुपारी अटिंगल लोकसभा मतदारसंघातल्या कट्टाकडा इथं एनडीएचे उमेदवार आणि केंद्रीय मंत्री व्ही मुरलीधरन यांच्यासाठी जाहीर सभा घेतली, यावेळी बोलताना येत्या पाच वर्षांत भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल आणि भाजपचा जाहीरनामा देशाच्याविकासावर भर देत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**राहुल गांधी-कोझिकोड**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजपवर निवडणूक रोखे योजनेचा गैरवापर करून पक्षाला देणग्या देणाऱ्या कंपन्यांना विविध प्रकल्प पुरविल्याचा आरोप केला आहे. ते काल संध्याकाळी केरळमधल्या कोझिकोड इथल्या जाहीर सभेत बोलत होते.

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया**

ज्या शुल्क रक्कमेचा मुख्य तथ्य विधान म्हणजेच 'की फॅक्टस स्टेटमेंट' मध्ये उल्लेख नाही असे कोणतेही अतिरिक्त शुल्क बँक कर्जदारांकडून घेऊ शकत नाहीत असं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं म्हटलं आहे. काल जारी केलेल्या परिपत्रकात रिझर्व्ह बँकेनं हे स्पष्टीकरण केलं आहे. 'की फॅक्टस स्टेटमेंट' मध्ये वार्षिक टक्केवारी दर आणि कर्जाच्या मुदतीवरील कर्जाचे परिशोधन वेळापत्रक देखील समाविष्ट असेल. रिझर्व्ह बँकेनं वार्षिक टक्केवारी दराची व्याख्या कर्जदाराचा पत वार्षिक खर्च अशी केली आहे ज्यामध्ये व्याज दर आणि क्रेडिट सुविधेशी संबंधित इतर सर्व शुल्क समाविष्ट आहेत. याशिवाय विमा शुल्क, कायदेशीर शुल्क इत्यादी तृतीय-पक्ष सेवा प्रदात्यांच्या वतीनं कर्जदारांकडून वसूल करण्यात आलेलं शुल्क देखील वार्षिक टक्केवारी दरामध्ये समाविष्ट असतील आणि ते स्वतंत्रपणे जाहीर केलं जाईल, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**ग्रीस लोकसंख्या**

ग्रीसमध्ये लोकसंख्येतील घट चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे आणि 'लोकसंख्या कमी' होणारा तो जगातील पहिला देश बनू शकतो, असं एका नवीन अहवालात म्हटलं आहे. ग्रीसमध्ये हृदयविकार, पक्षाघात, रक्ताच्या गुठळ्या आणि कर्करोगामुळं तरुणांच्या मृत्यूचं प्रमाण वाढलं आहे. हे संभाव्य संकट म्हणजे गर्भित धोका आणि राष्ट्रीय धोका असल्याचं ग्रीसचे पंतप्रधान किरियाकोस मित्सोटाकिस यांनी म्हटलं आहे. ग्रीसची लोकसंख्या गेल्या वर्षीच्या 10 पूर्णांक 4 दशलक्षवरून 2030 मध्ये फक्त 10 दशलक्षांपर्यंत खाली येऊ शकते असा अंदाज ग्रीसच्या राष्ट्रीय सांख्यिकी सेवा विभागानं वर्तवला आहे.

**कुवेत पंतप्रधान**

कुवेतचे नवे पंतप्रधान म्हणून अहमद अब्दुल्ला अल-अहमद अल-सबाह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी पंतप्रधान शेख मोहम्मद सबाह अल-सालेम अल-सबाह यांनी सात एप्रिलला राजीनामा दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. 4 एप्रिलला झालेल्या निवडणुकीनंतर शेख मोहम्मद यांनी 6 एप्रिललाच आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला. त्यानंतर शेख अहमद यांची नियुक्ती झाली आहे.

**लष्कर प्रमुख उझबेकिस्तान-दौरा**

भारत आणि उझबेकिस्तानमधील संरक्षण सहकार्य बळकट करण्यासाठी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे आजपासून उझबेकिस्तानच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्यांशी चर्चा,

बैठक करण्यासोबतच, लष्करप्रमुख 18 एप्रिलला दोन्ही देशांच्या सशस्त्र दलांदरम्यान होणाऱ्या डस्टलिक या संयुक्त लष्करी सरावासाठी तेर्मेझलाही भेट देतील.

**ओडिशा-बसअपघात**

ओडिशात, जाजपूर जिल्ह्यात काल रात्री पुलावरून एक बस खाली कोसळून झालेल्या अपघातात एका महिलेसह पाच जणांचा मृत्यू झाला आणि 35 हून अधिक जण जखमी झाले आहेत. ही बस पुरीहून पश्चिम बंगालमधील हल्दियाला जात होती. राष्ट्रीय महामार्ग-16 वरील बाराबती पुलावरून ही बस खाली कोसळली.

**जयन निधन**

ज्येष्ठ संगीतकार के. जी. जयन यांचं आज सकाळी निधन झालं. ते 90 वर्षांचे होते. त्यांनी मल्याळी आणि तमीळ चित्रपटांमध्ये एक हजारपेक्षा जास्त चित्रपटांना संगीत दिलं. त्यांचे जुळे बंधू दिवंगत विजयन यांच्यासह त्यांची जोडी जय-विजय बंधू म्हणून ओळखली जात असे. जयन यांना केरळ संगीत अकादमीचा पुरस्कार मिळाला होता.

**बुद्धीबळ**

कॅनडामध्ये टोरंटो इथं सुरू असलेल्या (फिडे) आव्हानवीरांच्या बुद्धीबळ स्पर्धेत काल रात्री झालेल्या दहाव्या फेरीत भारताचा युवा खेळाडू डी. गुकेश आणि इयान नेपोम्नियाची यांच्यातील लढत अनिर्णित राहीली. तरीही गुणांच्या बळावर डी. गुकेश अव्वल स्थानावर आहे. दरम्यान, विदित गुजराथीनं आर प्रग्यानंदविरुद्ध बरोबरी साधण्यास सहमती दर्शवली. या स्पर्धेच्या अंतिम चार फेऱ्या शिल्लक असताना, 18 वर्षीय आर प्रग्यानंद यातील आघाडीच्या खेळाडूंपेक्षा केवळ अर्ध्या गुणानं मागं आहे. हिकारू नाकामुरा आणि फॅबियानो कारुआना ही अमेरिकन जोडीदेखील प्रग्यानंद सोबत आहे. त्यामुळं खुल्या गटात विजय मिळवण्यासाठी पाच खेळाडूंना संधी आहे.

**मान्सून**

यावर्षी देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं, भूविज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन यांनी म्हटलं आहे. काल नवी दिल्ली इथे नैऋत्य मोसमी पावसाच्या अंदाजाबाबत प्रसारमाध्यमांना ते माहिती देत होते. जून ते सप्टेंबर या कालावधीत सामान्य पावसाच्या तुलनेत, सरासरी 106 टक्के पाउस पडण्याची शक्यता आहे असं त्यांनी सांगितलं. मात्र, त्याचवेळी, वायव्य, पूर्व आणि ईशान्येकडील राज्यांतील काही भागात पाऊस सरासरीपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. 1 जून ते 30 सप्टेंबर या कालावधीत संपूर्ण देशाच्या एकूण पावसाची सरासरी 87 सेमी असेल अशी माहिती, भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी यावेळी दिली.

**हवामान विभाग**

ईशान्य भारतात या महिन्याच्या 21 तारखेपर्यंत हलका ते मध्यम पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयच्या काही भागांमध्ये ही स्थिती असेल, तर 18 ते 21 तारखेपर्यंत उत्तर भारत, जम्मूकाश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागांमध्ये वेगवान वाऱ्यासह पाऊस आणि हिमवृष्टी होईल, असंही हवामान विभागानं म्हटलं आहे. दक्षिण भारतात, तीन ते पाच दिवसांमध्ये केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि लक्षद्वीपमध्ये विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडेल. दरम्यान, पुढील 3 ते चार दिवसांत आंध्र प्रदेश, तेलंगणच्या तसंच ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील दोन दिवसांत मध्य भारतात कमाल तापमान दोन ते चार अंश सेल्सिअसनं तर महाराष्ट्रात दोन ते तीन अंश सेल्सिअसनं वाढेल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**